**माहे जून २०२२ महाचा मासिक अहवाल**

**मासिक अहवालामध्ये खालील घटकांनी चांगली कामगिरी केलेली आहे.**


| अ क्र | घटकाचे नाव | श्वानाचे नाव / जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| १ | सांगली | तेजा डॉबरमन | १) पोहवा/३७९ एस.बी.सनदी | कवठेमहंकाळ पो. स्टे., जि. सांगली, गु.र.नं. २१९/२०२२ भा. द. वि. क. ३०२ हा गुन्हा दि.२/६/२०२२ रोजी १६:४५ वा. दाखल असून सदर गुन्हयातील ४ संशयीत इसमांना ओळखपरेड कामी एका रांगेत उभे करून सदर गुन्हयातील घटनास्थळावरून संशयीताचे पायातील बुटाचा वास श्वान तेजा यास देवुन सोडले असता. श्वान वास घेत घेत जावुन क्र. ३ चे संशयीत इसमाजवळ वास घेवुन थांबला व भुंकून इशारा दिला. सदर इसम नामे रॉबीन श्रीकांत खोत, वय २२ वर्षे, रा.पिंपळवाडी, कवठेमहंकाळ जि.सांगली यास ताब्यात घेवुन तपास केला असता गुन्हा उघडकीस आला. |



| अ क्र | घटकाचे नाव | श्वानाचे नाव / जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| २ | अकोला | रेवा डॉबरमन | १) पोहवा/१५२३ राजिव गंगाधर चौधरी<br>२) पोकाँ/४६ अतुल विजय दुतोंडे | बोरगाव पो. स्टे., जि. अकोला, गु.र.नं. ४५७/२०२२ भा.द.वि.क. ३८० हा गुन्हा दि. २१/६/२०२२ रोजी : वाजता दाखल असून श्वान रेवाने घटनास्थळावरील घरातील अलमारीचे ड्रॉवरला लावलेल्या डुप्लीकेट चावीचे वासावरून फि ाा चे घरातुन मागील दरवाजाने बाहेर निघुन बाजुलाच लागुन असलेला घरात जावुन घरातील बेडरूम मधील अलमारी जवळ जावून फिरून घुटमळून थांबली सदर घर राजेश माळोकार यांचे असल्याचे समजले. अलमारीची तपासणी केली असता चोरीतील नगदी रूपये मिळून आले. |



| अ क्र | घटकाचे नाव | श्वानाचे नाव / जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| ३ | औरंगाबाद ग्रामीण | खुशी डॉबरमन | १. पोहवा/८९५ व्ही.एस.तळेकर | शिरपुर पोलीस स्टेशन गु.र.नं. १५५/२०२२ भा.द.वि. कलम ३७६, ३२३ सदरचा गुन्हा दि.२०/६/२०२२ रोजी दाखल असून घटनास्थळवर मिळून आलेल्या सिमेंट व मातीने भरलेला एक बुटाचा जोड मिळून आल्याने सदर बुटाचा वास श्वान खुशीला दिला असता श्वान खुशी घटनास्थळापासुन माग काढीत शिवुर बंगला ते वैजापुर रोड ओलांडुन कच्च्या रस्त्याने हॉटेल साई पंढरीच्या बाजुने कच्च्या रस्त्याने जावुन हॉटेल मागील रमेश साहेबराव करडे यांचे नविन बांधकाम चालु असलेल्या रो हाउस नंबर २ मध्ये घुटमळून थांबली.<br>संशयीत इसमास तपासी अधिकारी यांनी ५ ते ६ इसमांमध्ये उभे करून श्वान खुशीला घटनास्थळावर मिळुन आलेल्या बुटाचा वास देवुन ओळख परेड घेतली असता श्वान खुशीने संशयीत इसमाचा वास घेवुन ओळखून भुंकून इशारा दिला. सदर इसम नामे प्रेमसींग मनसाराम मेवाळ, वय ५७ रा.तरय्याची वाडी ता.वैजापुर याचेकडे पुढील तपास केला असता गुन्हा उघडकीस आला. |



| अ क्र | घटकाचे नाव | श्वानाचे नाव / जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| ४ | गोंदीया | जॅक डॉबरमन | १. पोकाँ/२०८४ रॉबीन साठे<br>२. पोकाँ/१०४७ संजय शिवनकर | रेल्वे प्रोटेक्शन फोर्स गोंदीया पो.स्टे. गु.र.नं. ५४/२०२२ भा.द.वि. कलम ३९४ हा गुन्हा दि.२४/६/२०२२ रोजी १२:१३ वाजता दाखल असून सदर गुन्हयातील घटनास्थाला जीआरपी पथकासह भेट दिली असता घटनास्थळावर मिळालेल्या शर्ट व चाकूचा वास श्वान जॅक यास दिला असता श्वान जॅक वास घेत घेत रेल्वे स्टेशनच्या बाहेर जावुन संशयीत इसमाचे अंगावर जावून भुंकून इशारा दिला. सदर इसमाकडे तपास केला असता त्याचेकडून गुन्हयातील चोरीस गेलेला माल जप्त करण्यात आला आहे. |



अशा प्रकारे माहे जून २०२२ मध्ये श्वान पथकामार्फत खून - १, दरोडा - १, बलात्कार - १, घरफोडी - १ असे एकुण - ४ गुन्हे उघडकीस आलेले आहेत.